Dr. Yashawant Moreshwar Donde Sarwajanik Shaikshanik Trust's

# INDIRA MAHAVIDYALAYA

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401
Mob. Principal – 9422867658, Vice-Principal -9420199479
E mail - imvkalamb@yahoo.co.in, Website – www.indiramahavidyalaya.com

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल (२०२२–२०२३)

---

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्र. रासेयो–२०२२/प्र.क्र.१०६/साशि–७ दि.१जुलै २०२२ तसेच विद्यापीठाचे पत्र क्र. संगाबाअवि/रासेयो/१७/३०२/२०२२ दि. ०४/०७/२०२२ या पत्रांनुसार 'आझादी का अमृत महोत्सव' या अभियाना अंतर्गत इंदिरा महाविद्यालय, कळंब येथे विविध कार्यक्रम घेण्यात आले. दि. ६ ऑगस्ट २०२२ रोजी हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत घरोघरी १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या तिन्ही दिवशी तिरंगा लावण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य पवन मांडवकर हे होते. तसेच या कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ चव्हाण, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वीरा मांडवकर, उपप्राचार्य सरोज लखदिवे, प्रा. नीळकंठ नरुले, प्रा. प्रशांत जवादे, प्रा. अजय तगलपल्लेवार, डॉ. कैलाश नेमाडे, प्रा. शीतल राऊत, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा आर.के. भुरके, प्रा. एस. आर. जाधव, डॉ. पांडुरंग इंगळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तत्पूर्वी दि. ६ जून २०२२ रोजी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार 'शिवराज्याभिषेक दिन' संपन्न झाला. या कार्यक्रमाला काशिनाथ निकोडे व जितेंद्र कांबळे इ. नी उपस्थिती दर्शवली.

दि. २१ जून रोजी रासेयो च्या वतीने 'आंतराष्ट्रीय योग दिवस' संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर तर प्रमुख पाहुणे म्हणून शारिरिक शिक्षण संचालक प्रा. शीतल राऊत, उपप्राचार्य सरोज लखदिवे, प्रा. एन.व्ही. नरुले, डॉ. डी.एम.चव्हाण इ. उपस्थित होते. यामध्ये शारिरिक शिक्षण संचालक शीतल राऊत यांनी प्राणायाममध्ये अनुलोम विलोम, भस्रिका कपालभाती इ. तर योगासनांमध्ये ताडासन, गरुडासन, भुजंगासन, पवनमुक्तासन, इ.चे प्रामुख्याने प्रात्यक्षिक करून दाखविले. व या योगासनांचा अभ्यास उपस्थितांकडून करवून घेतला. डॉ. पवन मांडवकर यांनी शरीर व मन सुदृढ ठेवण्यासाठी रोज योगाभ्यास करणे व इतर महत्त्वाची आसने करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

दिनांक १ जुलै ते ७ जुलै २०२२ या कालावधीत शासनाच्या वृक्ष लागवड कार्यक्रमानुसार महाविद्यालय परिसरामध्ये १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यात कडुनिंब, चिंच, करंजी, गुलमोहर, बेल इ. वृक्षांची लागवड करण्यात आली महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेवकांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला. दि. ११ जुलै २०२२ ला रासेयोच्या वतीने तंबाखु मुक्ती दिन पाळण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य सरोज लखदिवे तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. प्रशांत जवादे , प्रा. डॉ. दशरथ चव्हाण, प्रा. डॉ. वीरा मांडवकर इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या दरम्यान रासेयो स्वयंसेवकांना तंबाखु मुक्त राहण्याची शपथ देण्यात आली. २६ जुलै २०२२ रोजी कारगील विजय दिवसाचे औचित्य साधून कारगील युद्धामध्ये शहीद झालेल्या वीरांची गाथा विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्‌देशाने 'कारगील विजय दिवस' पाळण्यात आला.

१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट व १५ ते ३० ऑगस्ट स्वच्छता पंधरवाडा पाळण्यात आला. या पंधरवाड्यात महाविद्यालय, परिसर, वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, बगिचा स्वच्छतागृहे याठिकाणी स्वच्छता करण्यात आली. याच दरम्यान रासेयो उद्‌बोधन वर्ग दि.२४ ऑगस्टला संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मांडवकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत जवादे व प्रा. एस. वाय. लखदिवे यांनी मार्गदर्शन दिले.

०३ ऑगस्ट या दिवशी 'गुरूवंदन सोहळा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात ज्येष्ठ व कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव केला जातो. यावर्षी माजी सिनेट सदस्य, इंदिरा महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य, समाजसेविका, लेखिका डॉ. सिंधूताई मांडवकर यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर, प्रा. रेखा वाठ, उपप्राचार्य प्रा. सरोज लखदिवे, प्रा.डॉ. माधुरी राखुंडे, प्रा. एन.व्ही नरूले मंचावर उपस्थित होते.

०९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात 'क्रांतिदिन' डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. रेखा वाठ उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एन.व्ही. नरुले आणि उपप्राचार्य सरोज लखदिवे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांची माहिती देण्यात आली. त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्रा. प्रशांत जवादे, प्रा. अजय तगलपल्लेवार, डॉ. कैलाश नेमाडे, प्रा. शीतल राऊत, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा आर.के. भुरके, प्रा. एस. आर. जाधव, डॉ. पांडुरंग इंगळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १० ऑगस्ट रोजी 'क्रांतीकारकांचे जीवनचरित्र आणि संचय' हा कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांकडून विविध क्रांतीकारकांची जीवनी आणि कार्याची माहिती गोळा करण्यात आली. यात उत्कृष्ट माहिती प्राप्त करून देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसेही देण्यात आली. यात प्रथम क्रमांक कु. स्नेहा खोकले, बी.कॉम भाग २, द्वितीय क्रमांक माहीन सय्यद – बारावी कॉमर्स, तृतीय क्रमांक वैभवी उरकुडे – बारावी कॉमर्स यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. प्रशांत जवादे, प्रा. अजय

तगलपल्लेवार यांनी केले. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ चव्हाण यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी डॉ. वेद पत्की, प्रा. रेखा वाठ, प्रा. माधुरी राखुंडे, डॉ. कैलाश नेमाडे, प्रा. शीतल राऊत, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा आर.के. भुरके, प्रा. एस. आर. जाधव, डॉ. पांडुरंग इंगळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ११ ऑगस्ट रोजी 'हर घर तिरंगा' रॅलीचे आयोजन मा. तहसिलदार, तहसील कार्यालय, कळंब यांनी पाठविलेल्या पत्र क्र. /कलि/नाना/कावि/४५०/२०२२ नुसार करण्यात आले. यात स्वातत्र्य सेनानी वेषभुषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रॅलीमध्ये दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रत्येक नागरिकाने आपापल्या घरावर तिरंगा झेंडा लावण्याबद्दल आवाहन करण्यात आले. सदर रॅलीमध्ये कळंब तालुक्याचे तहसिलदार मा. डॉ. सुनिल चव्हाण, तहसील कार्यालयातील कर्मचारी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ चव्हाण, प्रा. प्रशांत जवादे, प्रा. रेखा वाठ, प्रा, ए.व्ही. तगलपल्लेवार, डॉ. पांडुरंग इंगळे, प्रा. रंगराव लांजेवार, प्रा. एस.आर.जाधव, प्रा. आर.के.भुरके, श्री नरेश कोकांडे आणि मोठ्या संख्येने रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. १२ ऑगस्ट रोजी 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत जवादे हे उपस्थित होते. त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या युवकाने मोबाईलमध्ये गुंतुन न राहता स्वत:ची प्रगती करून देशाचे उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे, कारण आजचा तरूण म्हणजे उद्याचा देश आहे' असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मार्गदर्शनात केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. सरोज लखदिवे, प्रमुख अतिथी प्रा. रेखा वाठ उपस्थित होत्या. तसेच या कार्यक्रमात प्रा, ए.व्ही. तगलपल्लेवार, डॉ. पांडुरंग इंगळे, प्रा. रंगराव लांजेवार, प्रा. एस.आर.जाधव, प्रा. आर.के.भुरके, श्री नरेश कोकांडे आणि मोठ्या संख्येने रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. १३ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरिता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्य लढा या विषयावर आयोजित रांगोळी स्पर्धेत भरपूर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात प्रथम क्रमांक कु. गौरी खंडेतोड – बी.एस्सी.भाग ३, द्वितीय क्र. कु. आरती डोमकावळे – बी.ए. भाग २, तृतीय क्रमांक कु. वैभवी उरकुडे – वर्ग बारावी कॉमर्स यांना प्रदान करण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा सरोज लखदिवे आणि प्रा. शीतल राऊत यांनी केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दि. १४ ऑगस्ट रोजी 'सामान्य ज्ञान स्पर्धा' ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आली. या स्पर्धेत क्रांतीवीरांच्या जीवनावर आधारित प्रश्नावली तयार करण्यात आली होती. यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोदवला. यात प्रथम क्रमांक हर्षदीप लभाणे – बी.ए. भाग १, द्वितीय क्रमांक दिव्या बोभाटे – बी.ए. भाग १, तृतीय क्रमांक सुक्राणी बोभाटे – बी.एस्सी. भाग ३ यांना प्रदान करण्यात आले. यासाठी प्रा. स्नेहल खांडेकर यांनी नियोजन केले होते. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

दि. १५ ऑगस्ट रोजी 'झेंडावंदनाचा कार्यक्रम' संपन्न झाला. यावेळी उपप्राचार्य सरोज लखदिवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाविषयी माहिती सांगण्यात आली आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

दि. १७ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वराज्य सप्ताह अंतर्गत समुह राष्ट्रगीत गायन दि. १७ ऑगस्ट २०२२ सकाळी ११ वाजता महाविद्यालयामध्ये समुह राष्ट्रगीत गायन हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील उपप्राचार्य सरोज लखदिवे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ चव्हाण, प्रा. प्रशांत जवादे, प्रा. रेखा वाठ, प्रा, ए.व्ही. तगलपल्लेवार, डॉ. पांडुरंग इंगळे, प्रा. रंगराव लांजेवार, प्रा. एस.आर.जाधव, प्रा. आर.के.भुरके, श्री नरेश कोकांडे आणि मोठ्या संख्येने रासेयो स्वयंसेवकांनी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

२२ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणूक विभाग तहसील कार्यालय, कळंब च्या माध्यमातून नविन मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात आला. अठरा वर्षाच्या वरील प्रवेशित विद्यार्थ्यांना मतदार यादीमध्ये आपली नावे नोंदविण्यासाठी असणारी प्रक्रिया इ.ची माहिती देण्यात आली.

. दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांच्या अध्यक्षतेखाली उपप्राचार्य सरोज लखदिवे, प्रा. एन. व्ही. नरूले, डॉ. कैलाश नेमाडे , प्रा. पी. बी. इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दशरथ चव्हाण यांनी केले. .

दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी रासेयो च्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य सरोज लखदिवे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. वेद पत्की , प्रा. स्नेहल खांडेकर , प्रा. एस.पी. जवादे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वीरा मांडवकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी.एस. जवादे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य सरोज लखदिवे यांनी रासेयो उपक्रमाला महात्मा गांधींच्या प्रेरणेतुन देशसेवा व रासेयो यांचे अतुट नाते आहे असे सांगीतले. प्रा.डॉ. वेद पत्की यांनी रासेयोच्या चिन्हाचे महत्व समजावून सांगताना समाजसेवा करण्यासाठी अष्टौप्रहर जागृत रहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता प्रा. वीरा मांडवकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. यानंतर रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदान केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठया प्रमाणात उपस्थिती दर्शवली.

दिनांक २ ऑक्टोबर २०२२ रोजी रासेयो च्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. नेहरू युवा केंद्र, यवतमाळ यांच्या वतीने प्रयासवन, यवतमाळ येथे आयोजित स्वातत्र्याची ७५ वर्षे या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक सेविकांनी सहभाग नोंदविला.

दि. ९ ऑक्टोबर २०२२ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचा परिसर दत्तक ग्राम येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. दि. १५ ऑक्टोंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, 'मिसाइल मॅन' डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणादिन' म्हणून साजरी करण्यात आली. हा दिवस वाचन प्रेरणाध्यास म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. पवन मांडवकर उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य सरोज लखदिवे, प्रमुख वक्ते म्हणून प्रा. निळकंठ नरुले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. माधुरी राखुंडे यांनी वाचन प्रेरणादिनाचे महत्त्व सांगितले व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयांचा जास्तीतजास्त उपयोग करावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ पवन मांडवकर यांनी डॉं. कलाम यांच्या समग्र जीवनाचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर संवाद साधला. उपप्राचार्य सरोज लखदिवे यांनी आपल्या भाषणात अनेक प्रेरणादायी ग्रंथांची माहिती दिली. तसेच डॉ. कलाम यांच्या 'अग्नीपंख' विद्यार्थ्यांनी अवश्य वाचावे, असे नमूद केले. प्रा. नरुले यांनी डॉ. कलाम यांच्या बालपणाविषयी व कर्तृत्वाविषयी माहिती दिली.

दि. २८ ते २९ ऑक्टोबर दरम्यान कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तहसीलदार डॉ. सुनील चव्हाण, प्राचार्य डॉ. पवन मांडवकर व ग्रामीण रुग्णालयातील चमूने परिश्रम घेतले.

दि.२६ नोव्हेंबर २०२२ ला संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांच्या अध्यक्षतेखाली उपप्राचार्य सरोज लखदिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. ३१ नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी राष्ट्रीय एकात्मिक दिन शपथ रासेयो स्वयंसेवकांना देण्यात आली.

दिनांक १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन व दिनांक ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिनाचा कार्यकम घेण्यात आला. दिनांक ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पवन मांडवकर हे होते तर प्रमुख वक्ते प्रा.एन.व्ही. नरुले, उपप्राचार्य सरोज लखदिवे व प्रा. जवादे उपस्थित होते. दि. २४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिवस संपन्न झाला. या प्रसंगी राष्ट्रीय ग्राहक दिनाचे महत्त्व विषद करून अखिल भारतीय ग्राहक पंचायतची पार्श्वभूमी समजावून सांगितली.

दि. २० ते २२ जानेवारी रोजी विद्यापीठ स्तरीय व्यक्तिमत्त्व विकास शिबिर सावित्री जोतीराव फुले समाजकार्य विद्यालय, यवतमाळ येथे आयोजित कार्यशाळेला दोन विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दिनांक ३ जानेवारी २०२२ सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वीरा मांडवकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. शीतल राऊत व प्रा. माधुरी राखुंडे यांनी या निमित्ताने स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. वरील सर्व कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आले. त्याचप्रमाणे रासेयो तर्फे महाविद्यालयामध्ये संत गाडगेबाबा यांची जयंती व पुण्यतीथी निमित्य त्यांच्या प्रतिमेला हारार्पण करून स्वच्छता अभियान महाविद्यालय परिसरात राबविण्यात आले.

दि. १० फेब्रुवारी २०२३ ला ग्रामीण रुग्णालय कळंब व रासेयोच्या वतीने कोरोना जनजागृती संदर्भात स्वयंसेवकांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. दि.१५ फेब्रुवारी रोजी संत सेवालाल महाराज जयंती व दि. १६ फेब्रुवारी गुरू रविदास जयंती व १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मांडवकर, प्रा. पी. एस. जवादे, प्रा. डॉ. पांडुरंग इंगळे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना सबलीकरणाचे धडे दिले.

दि. ०८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. या प्रसंगी रांगोळी स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. वीरा मांडवकर, उपप्राचार्य प्रा सरोज लखदिवे, प्रा. माधुरी राखुंडे, प्रा. शीतल राउत, प्रा. स्नेहल खांडेकर उपस्थित होत्या.

सन २०२२–२३ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालय परिसरात, दत्तकग्राम थाळेगांव येथे रासेयो स्वयंसेवकांनी वेळोवेळी श्रमदान केले. या श्रमदानात परिसर स्वच्छता, वृक्षांना आळे करणे, वृक्षारोपण इ. कामे केली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रासेयो विभाग, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, आरोग्य विभाग यांच्या सुचनेनुसार विविध कार्यक्रम घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग दर्शविला. या सर्व कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, रासेयो जिल्हा समनवयक, क्षेत्रीय समन्वयक यांचे सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. तसेच रासेयो स्वयंसेवक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भरीव अशी मदत केली.

अशा प्रकारे सत्र २०२२–२३ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना इंदिरा महाविद्यालय, कळंब यांचे नियमित कार्यक्रम पार पडले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
इंदिरा महाविद्यालय, कळंब जि. यवतमाळ

प्राचार्य
इंदिरा महाविद्यालय, कळंब
जि. यवतमाळ

















**लोकमत**

## कळंब येथील इंदिरा महाविद्यालयात विविध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंब :** येथील इंदिरा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विविध कार्यक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी क्रांतिकारकांच्या कार्यावर लेखन व संचय या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे नियोजन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एम. चव्हाण, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. प्रशांत जवादे, अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अजय तगलपल्लेवार यांनी केले होते. यामध्ये प्रथम क्रमांक स्नेहा खोकले, द्वितीय माहीम सय्यद, तर तृतीय क्रमांक वैभवी उरकुडे यांनी पटकाविला. रांगोळी स्पर्धा आयोजनात प्रा. एस. वाय. लखदिवे, प्रा. शीतल राऊत यांनी पुढाकार घेतला. यामध्ये प्रथम क्रमांक गौरी खंडेतोडे, द्वितीय आर्त डोमकावळे, तर तृतीय क्रमांक वैभवी रोकडे यांनी मिळविला. सामान्य ज्ञान स्पर्धेत हर्षदीप लभाने यांनी प्रथम, दिव्या बोभाटे द्वितीय, तर तृतीय क्रमांक शुक्राणी बोभाटे यांनी पटकाविला. या स्पर्धेसाठी प्रा. एस. आर. खांडेकर यांनी पुढाकार घेतला. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी कौतुक केले.

Hello Yavatmal
Page No. 4 Aug 29, 2022
Powered by: erelego.com

# इंदिरा महाविद्यालयात रासेयो तर्फे “आजादी का अमृत महोत्सव” अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन







# नवजीवन

## इंदिरा महाविद्यालय कळंब, येथे वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम संपन्न

**नवजीवन, ब्युरो**

**यवतमाळ** : स्थानिक, इंदिरा महाविद्यालय कळंब येथे वृक्षांना राखी बांधून वृक्ष संवर्धनाचा कार्यक्रम संपन्न झाला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष महत्वाची कामगीरी बजावत असतात.

परंतु, अलीकडे पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस बिघडत चालला आहे, अशा परिस्थितीमध्ये वृक्षारोपण करणे ही, काळाची गरज बनली आहे. झाडे हे आपल्या निसर्गाचा महत्वाचा घटक आहे. वृक्ष आपल्या निसर्गाची शोभा वाढवतात. आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी झाडे महत्वाची भूमिका बजावत असतात. अनेक वृक्षांमध्ये तर औषधी गुणधर्म आहेत. पर्यावरणाला निसर्गाला झाडांमुळे सौंदर्य प्राप्त होते. परंतु वृक्षांची तोड मोठया प्रमाणात झाल्यामुळे आजुबाजूचे वन क्षेत्र कमी झाले आहे. आणि म्हणून वृक्षारोपणा सोबतच, वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

या पार्श्वभूमीतून विद्यार्थी व शिक्षकांनी वृक्षांना राखी बांधून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी विद्यार्थी व शिक्षकांनी स्विकारली. हा कार्यक्रम वाणिज्य विभाग, गृहअर्थशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग तसेच शारीरिक शिक्षण विभागातर्फे घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. रेखा वाठ, प्रा. डॉ. माधुरी राखुंडे, प्रा. सरोज लखदिवे, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा. डॉ. डी. एम. चव्हान, प्रा. शितल राऊत, अर्चना भोयर तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांयनी सहभाग नोंदविला.







'कारगील विजय दिवस'





## इंदिरा महाविद्यालय कळंब रासेयो तर्फे स्वच्छता अभियान संपन्न



कळंब – स्थानिक इंदिरा महाविद्यालय कळंब जिल्हा यवतमाळ च्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले स्वच्छता मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात गाजर निर्मूलन व घनकचरा साफ करण्यात आले. तसेच विविध ठिकाणी स्वच्छता राष्ट्रीय स्वयंसेवकाकडून करून घेण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवकांना वैराग्यमूर्ती गाडगेबाबांचे विचार अंगीकार व्हावयास सांगितले या स्वच्छता मोहिमेच्या यशस्वी आयोजनाकरिता राष्ट्रीय कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एम. चव्हाण व महिला कार्यक्रम धिकारी डॉ. विरा पांडवकर यांनी परिश्रम घेतले या स्वच्छता अभियान कार्यक्रमांमध्ये प्रा. पी. एस. जवादे डॉ. के.आर. नेमाडे डॉ. पी.बी. इंगळे प्रा. एस. आर. खांडेकर सर्व शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्या राष्ट्रीय स्वयंसेवक यांनी सहभाग नोंदविला.



१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट व १५ ते ३० ऑगस्ट स्वच्छता पंधरवाडा










## कळंब येथील इंदिरा महाविद्यालयात गुरुंचा सत्कार सोहळा

**कळंब :** येथील इंदिरा महाविद्यालयात रासेयोच्या वतीने गुरुवंदन सोहळा घेण्यात आला. महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या तथा सिनेट सदस्य डॉ.सिंधूताई मांडवकर यांना गुरुवंदन करून त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.पवन मांडवकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपप्राचार्य डॉ. मार्तंड खुपसे, डॉ.जी.पी. उरकुंदे, प्रा.डी.एस. पाटील, प्रा.रेखा वाठ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची भूमिका कार्यक्रम अधिकारी डॉ.दशरथ चव्हाण यांनी प्रास्ताविकातून मांडली. आभार डॉ.पांडुरंग इंगळे यांनी मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा.सरोज लखदिवे, प्रा.नीळकंठ नरुले, प्रा.माधुरी राखुंडे, प्रा. प्रशांत जवादे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.वीरा मांडवकर, प्रा.स्नेहल खांडेकर, प्रा.शीतल राऊत, डॉ.वेद पत्की, डॉ.कैलास नेमाडे, प्रा.आर.के.भुरके, राजू झोटिंग, माणिकराव काटकर, काशिनाथ निकोडे, विशाल टाकळे, विशाल कोदाने, रंजन वनकर, नरेश कोकांडे उपस्थित होते.

Hello Yavatmal
Page No. 4 Aug 23, 2022

गुरूवंदन सोहळा' हा कार्यक्रम






०९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात 'क्रांतिदिन







## कळंब येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कळंब :** येथील इंदिरा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. व्ही. लखदिवे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. आर. एम. वाठ, प्रा. एन. व्ही. नरुले आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विविध विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली. परीक्षा, स्पर्धा परीक्षा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न मांडले. प्रसंगी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एम. चव्हाण यांनी प्रास्ताविकातून आजादी का अमृत महोत्सवांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दिली. संचालन डी. एम. चव्हाण यांनी केले. आभार डॉ. पांडुरंग इंगळे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. माधुरी राखुंडे, प्रा. अजय तगलपल्लीवार, प्रा. स्नेहल खांडेकर, प्रा. शीतल राऊत, प्रा. आर. के. भुरके, काशीनाथ निकोडे, आर. बी. चव्हाण, विशाल कोदाने, नरेश कोकांडे आदी उपस्थित होते.

लोकमत 15/08/2022

दि. १२ ऑगस्ट रोजी 'आंतरराष्ट्रीय युवा दिन'






रासेयो उद्बोधन वर्ग दि.२४ ऑगस्टला संपन्न झाला










**नवजीवन**

# इंदिरा महाविद्यालयात गांधी जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



नवजीवन वृत्तसेवा

**यवतमाळ** : स्थानिक, इंदिरा महाविद्याल कळंब येथे, रा. से. यो. विभागातर्फे गांधी जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वैयत्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. कीर्ती माहुरे-बी. ए. भाग १, द्वितीय क्रमांक रणजीत कुंभेकर- बी. ए. भाग ३ तृतीय क्रमांक शिफा कासमानी- बी. ए. भाग १ यांनी प्राप्त केला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून वाणिज्य विभागप्रमुख प्रा. रेखा वाठ, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. प्रशांत जवादे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दशरथ चव्हाण यांनी परीक्षण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी स्थान भूषविले. अध्यक्षीय भाषणात डॉ. मांडवकर यांनी गांधीजींच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी आजच्या काळात गांधीजींच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजय तगलपल्लेवार आणि आभार प्रदर्शन डॉ. वीरा मांडवकर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य सरोज लखदिवे, प्रा. एन. व्ही. नरूले, प्रा. शीतल राऊत, प्रा. स्नेहल खांडेकर, डॉ. वेद पत्की, डॉ. कैलाश नेमाडे, डॉ. पांडुरंग इंगळे आणि मोठया संख्येने रासेयो स्वयंसेवकांनी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.




**नवजीवन**

# इंदिरा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



नवजीवन वृत्तसेवा

**यवतमाळ** : स्थानिक, इंदिरा महाविद्याल कळंब येथे, नुकताच रा.से.यो. दिन साजरा करण्यात आला. इंदिरा महाविद्यालयात अनेक वर्षांपासून विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम राबविण्यात येतो. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी म्हणून सेवा देण्याचा महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांना दीर्घ अनुभव आहे.

याच अनुभवाचा लाभ रा. से. यो. स्वयंसेवकांना मिळावा आणि रा. से. यो. स्वयंसेवकांनी केलेली समाजसेवेची ओळख व्हावी म्हणून रा. से. यो. दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर आणि प्रमुख अतिथी म्हणून माजी रा. से. यो. क्षेत्रीय समन्वयक डॉ. माधुरी राखुंडे उपस्थित होत्या. नॉट मी बट यू' हे रा. से. यो. चे ब्रीदवाक्य. प्रत्येक व्यक्तीचे कल्याण हे समाजाच्या कल्याणावर अवलंबून असते म्हणून प्रत्येक स्वयंसेवकांनी समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

असे विवेचन डॉ. माधुरी राखुंडे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. तसेच रा. से. यो. कार्यक्रमाचा उद्देश समुदाय सेवेद्वारे प्रत्येक स्वयंसेवकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे हाच आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पवन मांडवकर यांनी केले. कार्यक्रमानंतर रा. से. यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर आणि दत्तकग्राम थाळेगाव येथे श्रमदान करून स्वच्छता केली. यावेळी महावद्यालयातील माजी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. रेखा वाठ, प्रा. सरोज लखदिवे, प्रा. एन. व्ही. इंदिरा महाविद्यालयात रासेयो दिन कार्यक्रम संपन्न नरूले, प्रा. प्रशांत जवादे तसेच विद्यमान कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ चव्हाण, डॉ. वीरा मांडवकर, उपस्थि होते. महाविद्यालयातील प्रा. शीतल राऊत, प्रा. स्नेहल खांडेकर, डॉ. वेद पत्की, डॉ. कैलाश नेमाडे, डॉ. पांडुरंग इंगळे आणि मोठ्या संख्येने रासेयो स्वयंसेवकांनी यावेळी उपस्थिती दर्शविली.









महापरिनिर्वान दिन

## इंदिरा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना तर्फे सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमाचे आयोजन

कळंब – स्थानिक इंदिरा महाविद्यालयामध्ये दिनांक ३ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना तर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. एस.वाय. लखदिवे हे अध्यक्षस्थानी होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.डी. एम. चव्हाण हे होते. या कार्यक्रमामध्ये बोलत असताना आजच्या स्त्रियांना मिळत असलेला सन्मान हे केवळ



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळेच मिळत आहे असे प्रतिपादन डॉ. डी. एम. चव्हाण यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमानिमित्त इंदिरा महाविद्यालय कळंब बीएससी भाग १ ची विद्यार्थिनी कु. लीलारे हिने सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान करून 'मी सावित्री' या विषयावर भाषण केले. तसेच बी.ए. भाग १ ची विद्यार्थिनी कुमारी शिफा कासमानी हिने सुद्धा सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनामिका भोयर यांनी केले तर कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता श्री चेतन बंडोजी मोहरले यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमा करिता महाविद्यालयातील प्राध्यापक कु. एस एस. राऊत, कु. एस. आर. खांडेकर बहुसंख्य राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते